अतारांकित प्रश्नोत्तरांची चौथी यादी

महाराष्ट्र विधानपरिषद

तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२०

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

महाराष्ट्र लोकपाल आणि लोक आयुक्त कायद्यात सुधारणा करण्याबाबत

(१) ३२१ (१८-०३-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५६५ ला दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लोकपाल आणि लोक आयुक्त विधेयक सन २०११ मधील कलम ६३ ते ९७ मधील तरतुदी विचारात घेऊन शासनाने सक्षम लोक आयुक्त कायदा करावा व त्यानुसार लोक आयुक्तांची नियुक्ती करावी अशी मागणी श्री.अण्णा हजारे यांनी दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रातील बाबी तसेच केंद्रीय लोकपाल अधिनियमातील तरतुदी विचारात घेऊन महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ मध्ये सुधारणा सुचविणे व सक्षम लोक आयुक्त कायदा करण्याच्यादृष्टीने विचारविनिमय करण्यासाठी तसेच सुधारीत अधिनियमाचा मसुदा तयार करण्यासाठी दिनांक १० मार्च, २०१९ रोजी संयुक्त मसुदा समिती शासनाने स्थापन केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीची रचना कशी करण्यात आलेली आहे तसेच समितीच्या किती बैठका आयोजित करण्यात आलेल्या आहेत व समितीचा अहवाल प्राप्त झाला काय, त्याचे स्वरुप काय आहे आणि त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे (२६-०८-२०२०) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सदर संयुक्त मसुदा समितीमध्ये एकूण ९ शासकीय/अशासकीय सदस्य आहेत. प्रस्तुत बाब समितीच्या विचाराधीन आहे.

राज्यात डिजिटल सातबारा सुरु करण्याबाबत

(२) ४३१ (१८-०३-२०२०). श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक ४७६४८ ला दिनांक २५ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००६ पासून डिजिटल सातबारा ही संकल्पना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून १७ वर्षाचा कालावधी होऊनही राज्यात पूर्णपणे डिजिटल सातबारा होऊ शकला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १७ वर्षांच्या कालावधीत राज्यात किती टक्के सातबारा डिजिटल करण्यात शासनाला यश आले आहे,
(३) असल्यास, या संकल्पनेसाठी तलाठी मंडळ अधिकारी हे तांत्रिक दृष्ट्या तितके सक्षम नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात डिजिटल सातबारा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (१०-०८-२०२०) : (१) व (२) राज्य शासनाने सन २००५ मध्ये राज्यातील सर्व अधिकार अभिलेख (गा.न.नं.७/१२) संगणकीकृत करण्याचा निर्णय घेतला होता. तद्नंतर सन २०१८-२०१९ मध्ये डिजिटल स्वाक्षरी अधिकार अभिलेख जनतेला ऑनलाईन उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून, त्यानुसार राज्यातील २.५२ कोटी गा.न.नं. ७/१२ पैकी २.४९ कोटी गा.न.नं. ७/१२ (अधिकार अभिलेख) डिजिटल स्वाक्षरी करून जनतेला महाभूमि पोर्टलव्दारे ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

राज्यातील १००% गा.न.नं.७/१२ डिजिटल स्वरूपात जनतेला महाभूमि पोर्टल वरील भूलेख या लिंकवर मोफत पाहण्यासाठी उपलब्ध असून ९९% डिजिटल स्वाक्षरीत गा.न.नं.७/१२ डाऊनलोड करण्यासाठी सशुल्क उपलब्ध आहेत.

(३) हे खरे नाही.

ई-फेरफार प्रणालीच्या कामकाजासाठी सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले असून, तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावरील मास्टर ट्रेनर्सला देखील प्रशिक्षण दिले असल्याने राज्यातील सर्व तलाठी मंडळ अधिकारी यांच्याकडून सक्षमपणे प्रणालीव्दारे कामकाज करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी शहरातील वक्फ मालकीच्या जागेवर विनापरवाना बांधकामाबाबत

(३) ६९७ (१८-०३-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे : दिनांक २० जुलै, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ३६९४३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **वक्फ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील सर्व्हे नं. ६३६ व ६३७ मधील १०० एकर जमिनीवर महानगरपालिकेची परवानगी न घेता बांधकाम करुन अतिक्रमण केल्याबाबत

सामाजिक कार्यकर्त्यांनी लेखी निवेदनाव्दारे विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे खोटे दस्ताऐवज बनवून बांधकाम परवाने मिळविणाऱ्या दोषींविरूध्द कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बांधकाम परवानगी कागदपत्रे, खोटे दस्ताऐवज व इतर गैरप्रकारांची चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच विनापरवाना बांधकाम केलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त कामांची कामनिहाय माहिती काय आहे ?

श्री.नवाब मलिक (२४-०७-२०२०) : (१) होय.

(२) खोटया दस्ताऐवजा आधारे कोणतेही बांधकाम मंजूर करण्यात आलेले नाही. तथापि, इदगाह मैदानावर अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून आयुक्त, महानगरपालिका, परभणी यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार १७ अनधिकृत टिनशेड दुकानांना सन, २०१६ मध्ये महापालिकेकडून नोटीसा बजावण्यात आल्या होत्या सदर नोटीसांविरुध्द अतिक्रमणधारकांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे सी.आर.ए.क्र. ३०/२०१९ दाखल केली असून दिनांक १२/०२/२०१९ च्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने "जैसे थे परिस्थिती ठेवणे" बाबत दिलेले आदेश दिनांक १७/०२/२०२० च्या आदेशान्वये पुढे सुरु ठेवण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असा अहवाल आयुक्त, परभणी महानगरपालिका यांनी सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

व्यावसायिक व उच्च माध्यमिक अभ्यासक्रम एन.एस.क्यु.एफ.शी सुसंगत करण्याबाबत

(४) ९४७ (१८-०३-२०२०). श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांच्या अनेक मागण्या वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने व्यवसाय अभ्यासक्रम परिणामकारकरित्या राबविण्यात अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार एन.एस.क्यू.एफ.शी सुसंगत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अभ्यासक्रमांना अजूनपर्यंत एन.एस.क्यू.एफ.शी सुसंगता तसेच मान्यता मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये याकरीता दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयामधील त्रुटींमध्ये सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नवाब मलिक (२३-०७-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांचे अन्य पर्यायामध्ये रुपांतर करण्याच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी दिनांक १६ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्व्ये समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आंगवली सोनारवाडीत (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) बिबटयाने शेळया ठार केल्याबाबत

(५) १०६९ (१८-०३-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंगवली सोनारवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) परिसरात बिबटयाने एका शेतकऱ्यांच्या ४ शेळया ठार केल्या असून या गावात भितीचे वातावरण

निर्माण झाले असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेळीमालकास त्याची नुकसान भरपाई देण्यासाठी व पिंजरे लावून बिबटयाला पकडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (१४-०७-२०२०) : (१) व (२) दिनांक ०१/०१/२०२० रोजी श्रीमती सकिना इसाक हरचिरकर, रा. आंगवली सोनारवाडी ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी यांच्या मालकीच्या ४ शेळ्या बिबट्याच्या हल्ल्यात मृत झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

सदर प्रकरणी नुकसान ग्रस्त पशुधन मालकास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार रुपये २०,६२५/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

घटनाग्रस्त परिसरात वन कर्मचाऱ्यांमार्फत रात्रीच्या वेळेस गस्त घालण्यात येते. तसेच स्थानिकांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या उदेशाने माहिती देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

माथेरान मिनी ट्रेनच्या शटलकरीता जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत

(६) १६०५ (१८-०३-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान मिनी ट्रेनच्या अमन लॉज ते माथेरान अशा शटल सेवा सुरु करुन या मिनी ट्रेनची देखभाल करण्यासाठी घाटमाथ्यावर जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत रेल्वे प्रशासनाने जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन माथेरान मिनी ट्रेनच्या शटलकरीता जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (३१-०७-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अधीक्षक माथेरान यांनी वरिष्ट सहा. मंडळ अभियंता (ट्रॅक) मध्य रेल्वे, कल्याण यांच्यासह स्थळपाहणी करणेबाबत वारंवार विनंती करुनही रेल्वे प्रशासनाकडून अद्याप प्रतिसाद अप्राप्त आहे. तसेच मुख्याधिकारी, माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांनीही कार पार्किंग विकसित करणेकरीता विषयांकित जमिनीची मागणी केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागातील शिक्षक व इतर कर्मचारी यांच्या विनाअनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत

(७) २४७२ (१८-०३-२०२०). श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाने त्यांच्या विभागातील शिक्षकांसाठी विनाअनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात येईल असा शासन निर्णय सन २००६ मध्ये काढला परंतु कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभागाने आजपोवतो सदर शासन निर्णय निर्गमित केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नवाब मलिक (१२-०६-२०२०) : (१) सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

तेंदूपान व्यवसायाकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याबाबत

(८) २८५९ (०२-०६-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तेंदूपान व्यवसायाकडे शासनाचे दुर्लक्ष असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेंदूपान व्यवसायाकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे अडीचशे कोटीचे व्यवहार ठप्प होवून अनेक गांवकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टाळेबंदीच्या काळात शासन शेती व्यवसायाला, शेतमालाच्या वाहतुकीला परवानगी देवू शकते तर तेंदूपानासाठी परवानगी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तेंदूपान व्यवसायाला चालना देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (२७-०७-२०२०) : (१) व (२) सन २०२० तेंदू हंगामात बिगर अनुसूचित क्षेत्रात माहे डिसेंबर, २०१९ ते माहे मे, २०२० दरम्यान ई-निविदेच्या एकूण ०८ फेरीअंती १४४ तेंदू घटक/घटकसमुह विक्री झालेले आहेत. विक्री झालेल्या तेंदू घटकांतून माहे मे, २०२० अखेर ७१.२६ टक्के तेंदू पाने संकलीत झाले आहेत.

१४४ "तेंदू घटक/घटक समुह विक्री"मुळे तेंदूपाने संकलनकर्त्यास रोजगार उपलब्ध झाला आहे.

(३) व (४) शासनाने दिनांक १५/०४/२०२० व दिनांक १७/०४/२०२० रोजीचे निर्गमित केलेल्या अधिसूचनान्वये निर्गमित केलेल्या सूचनेनुसार ताळेबंदीच्या कालावधीत तेंदूपाने विक्री, संकलन/प्रक्रिया व वाहतुकीकरीता परवानगी दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद औद्योगिक परिसरात आयटी हबची उभारणी करणेबाबत

(९) २८६३ (२८-०५-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक दृष्टया जगाच्या नकाशावर मान्यता पावलेल्या औरंगाबादमध्ये आयटी हब उभारण्यासाठी शासन त्या दृष्टीने पुढाकार घेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयटी हबची औरंगाबादमध्ये उभारणी होण्याच्या दृष्टीने माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.उद्योग मंत्री महोदयासह आय.टी.कंपन्याच्या प्रतिनिधीने ऑरिकची पाहणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबादमध्ये उत्तम दर्जाच्या शैक्षणिक सुविधा असल्याने अभियांत्रिकी महाविद्यालयातून बाहेर पडणारे टॅलेंट औरंगाबादमध्येच कार्यरत राहिल्यास आयटी उद्योग वाढीसाठी प्रयत्न होतील व टॅलेंटला इतर ठिकाणी नोकरीसाठी जाण्याची गरज भासणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आयटी हब औरंगाबादमध्ये उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई (२५-०८-२०२०) : (१), (२) व (३) होय.

औरंगाबाद शहरामध्ये आयटी पार्क उभारण्याच्यादृष्टीने पहिल्या टप्प्यात चिकलठाण औद्योगिक क्षेत्रात १२.०५ हे. आर क्षेत्रावर आयटीपार्क उभारण्यात आले असून त्यामध्ये विविध आकाराचे ३८ भूखंड पाडून आयटी कंपन्यांना वाटप केलेले आहे. त्याठिकाणी आयटी व्यवसाय सुरु आहे. आयटी इमारत बांधण्यात आली असून त्यामध्ये ३२ गाळे असून त्यामधील २३ गाळे आयटी कंपन्यांस भाडे तत्वावर देण्यात आले आहेत.

(४) शासनाच्या धोरणानुसार आयटी क्षेत्र विकसित होण्याच्यादृष्टीने अस्तित्वात असलेल्या चिखलठाणा औद्योगिक क्षेत्रामध्ये सन २००० साली प्रथम देवगिरी आयटी पार्क या नावाने १२.०५ हे.आर क्षेत्रावर उभारण्यात आले आहे. त्यामध्ये एकूणा ३८ भूखंड आरेखित करुन आयटी कंपन्यांना वाटप केलेले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर यांचेमध्ये ५१.४९ प्रमाणात भांडवली गुंतवणूक करण्याच्या हेतूने औरंगाबाद इंडस्ट्रीयल टाऊनशिप लि. औरंगाबाद ही कंपनी स्थापन करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण ते औरंगाबाद राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१०) २८७८ (२९-०५-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २३९ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण ते औरंगाबाद या दोन शहरांना व महत्वाच्या औद्योगिक व सांस्कृतिक क्षेत्राला पुरक ठरणाऱ्या राज्य मार्गाच्या चौपदरीकरण करण्याच्या कामाला शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मंजूरी दिलेल्या कामाचे स्वरुप काय आहे तसेच सदर काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (२०-०७-२०२०) : (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने औरंगाबाद पैठण या राज्य मार्गाचे रुपांतर राष्ट्रीय महामार्गात करुन त्यास एनएच-७५२ ई (NH-७५२ E) हा क्रमांक दिला असून केंद्र शासनाने सदरील रस्त्यास मध्यम प्राधान्यक्रम (Medium Priority) अंतर्भूत केला असून त्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतिपथावर आहे. सदर प्रकरणी केंद्र शासनातर्फे 'भारतमाला' योजनेंतर्गत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत DPR बनविण्याचे काम मे.ईगीस इंडिया मर्या. या सल्लागार कंपनीकडून प्रगतिपथावर आहे, त्यामुळे चौपदरीकरणाच्या कामाला शासनाने मंजूरी दिली म्हणणे संयुक्तिक होणार नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे

(२) DPR अंतिम होईपर्यंत प्रकल्प मंजूरीबद्दल सांगणे उचित होणार नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

लातूर-बार्शी-मार्गे टेंभुर्णी या सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबत

(११) २८७९ (०३-०६-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर-बार्शी मार्गे टेंभुर्णी येथे सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरण करण्याच्या कामास शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने मंजूरी दिलेल्या कामाचे स्वरुप काय आहे व काम सुरु होऊन पूर्ण होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (२०-०७-२०२०) : (१) हे खरे नाही.

म्हसवड-माळशिरस-टेभूर्णी-कुर्डुवाडी-बार्शी-येडशी-लातूर हा रस्ता राज्य मार्ग क्रमांक १४५ असा होता. तथापि, केंद्र शासनाच्या दिनांक ३/०१/२०१७ च्या अधिसूचनेनुसार सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ सी म्हणून घोषित झालेला आहे. सबब, सदरहू रस्त्याचे पुढील दर्जोनती व सुधारण्याचे काम केंद्र शासनामार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

किमान योग्यता व्यावसायिक अभ्यासक्रम एमसीव्हीसी शिक्षकांना योजनेचे लाभ देणेबाबत

(१२) २८९६ (२८-०५-२०२०). श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे : सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार १० वर्षे, २० वर्षे व ३० वर्षानंतर वेतनश्रेणी मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदर सुधारित वेतनश्रेणी मिळण्याबाबत समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन किमान योग्यता व्यावसायिक अभ्यासक्रम एमसीव्हीसी (MCVC) शिक्षकांनाही सुधारित १० वर्षे, २० वर्षे व ३० वर्षानंतर वेतनश्रेणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नवाब मलिक (१२-०६-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक ३१ जुलै, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

(३) व (४) वरीलप्रमाणे स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल विचारात घेऊन विभागात कार्यवाही करण्यात येणार आहे

नागपूर ग्रामीण पोलिसांच्या वरदहस्ताने कोळसा तस्कर सक्रीय असल्याबाबत

(१३) २९२० (०२-०६-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नागपूर ग्रामीण पोलिसांच्या वरदहस्ताने कोळसा तस्कर सक्रीय झाले असून अनेक ठिकाणी या तस्कराचा टोळया कार्यरत असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तस्करामुळे वीज औष्णिक केंद्राला दर महिन्याला निकृष्ट वीज पुरवठा करून केंद्राला लाखो रूपयाचा भूर्दंड पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज केंद्रा मधील काटयावर असलेले कर्मचारी व ट्रकचालक यांच्या संगनमताने लाखो रूपयांची फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. नितिन राऊत (२७-०७-२०२०) : (१) हे खरे नाही.

पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांच्या अहवालानुसार नागपूर ग्रामीण जिल्हयात कोळसा चोरी संबंधात सन २०२० मध्ये ४ गुन्हे दाखल झाले आहेत. तथापि, सदर गुन्हयांच्या तपासात वीज केंद्रामधील काटयावर असलेले कर्मचारी व ट्रकचालक यांच्या संगनमताने लाखो रुपयांची फसवणूक करण्याबाबतचा कोणताही प्रकार नमूद गुन्हयांच्या तपासात उघडकीस आलेला नाही किंवा अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-गोवा महामार्गावरिल चिपळूण-परशुराम ते आरवली रस्त्यांचे काम संपूर्णत: बंद असल्याबाबत

(१४) २९३३ (०३-०६-२०२०). श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरिल चिपळूण-परशुराम ते आरवली दरम्यानच्या ३६ किमी लांबीच्या रस्त्यांचे काम संपूर्णत: बंद पडलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंद पडलेले काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्यात यावे अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, चिपळूण आदींकडे प्रत्यक्ष भेटून तसेच लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त काम बंद पडण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर बंद पडलेले काम विनाविलंब हाती घेवून शीघ्रगतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (२०-०७-२०२०) : (१) हे खरे नाही.

मुंबई गोवा महामार्गावरील चिपळूण परशुराम घाट ते आरवली दरम्यानचे ३५.९० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम सुरु आहे.
(२) मा.डॉ.विनय नातू, माजी आमदार यांचेकडून दिनांक १८/०३/२०२० रोजी निवेदन प्राप्त झाले होते. त्याला अनुसरुन लेखी माहिती महोदयांना सादर करण्यात आली आहे.
(३) काम पूर्णत: बंद पडलेले नसून कामाची प्रगती मंद असल्याने याबाबत कंत्राटदारांस करारनाम्यानुसार कामाची गती वाढविण्याबाबत नोटीस बजाविण्यात आलेली असून शीघ्रगतीने काम करवून घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गुहागर-चिपळुण (जि.रत्नागिरी) मार्गावरील मोडकाघर पूल तसेच गुहागर ते पाटपन्हाळे शृंगारतळी रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत

(१५) २९३५ (२९-०५-२०२०). श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर-चिपळुण (जि.रत्नागिरी) मार्गावरील वाहतुकीसाठी धोकादायक ठरलेल्या मोडकाघर पूलाची दुरूस्ती तसेच गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील पूर्णत: दुरवस्था झालेल्या गुहागर ते पाटपन्हाळे शृंगारतळी या रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत ग्रामस्थ व माजी लोकप्रतिनिधी डॉ.विजय नातू यांनी राष्ट्रीय महामार्गांचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ रत्नागिरी, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, चिपळुण आदीकडे गत एक वर्षापासून सातत्याने लेखी निवेदनाव्दारे मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ च्या पावसाळयात मोडकाघर पूल वाहतुकीसाठी ४ महिने बंद ठेवण्यात आल्याने वाहनचालक व प्रवाश्यांना नाहक अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागले असून पुन्हा यावर्षीही पावसाळयात हा पूल बंद होण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मोडकाघर पूलाचे दुरूस्तीचे तसेच गुहागर-पाटपन्हाळे-शृंगारतळी रस्त्यांच्या दुरूस्तीचे काम हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (२०-०७-२०२०) : (१) हे खरे आहे. गुहागर-चिपळुण (जि.रत्नागिरी) मार्गावरील वाहतुकीसाठी धोकादायक ठरलेल्या मोडकाघर पूलाची दुरूस्ती तसेच गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील पूर्णत: दुरवस्था झालेल्या गुहागर ते पाटपन्हाळे शृंगारतळी या रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत माजी लोकप्रतिनिधी डॉ.विजय नातू यांनी दिनांक ०४/०३/२०२० च्या लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली होती.

(२) सन २०१९ च्या पावसाळयात मोटकाघर पूल धोकादायक झाल्याने सुरक्षेच्या दृष्टीने पुलावरुन वाहतूक सुरु ठेवणे योग्य नसल्याने पूल वाहतुकीसाठी ४ महिने बंद ठेवण्यात आला होता. तथापि, आता सदर पूलाचे पुनर्बांधणीचे काम दिनांक २०/०४/२०२० रोजी जिल्हाधिकारी यांचे परवानगीने सुरु करण्यात आले आहे व ऑगस्ट, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सध्या पूल वाहतुकीस बंद असल्याने अस्तित्वातील एन्रॉन कंपनीच्या

(७.० मी.रुंद) सुस्थितीतील रस्त्यावरुन वाहतूक वळविण्यात आली असून सुरळीत सुरु आहे.

(३) व (४) मोडकाघर धरणाच्या बॅकवॉटरमध्ये येत असल्याने येथील धरण्याच्या पाण्याची पातळी ही कायम ५.५ मीटर पेक्षा जास्त असल्याने पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर मार्च, २०२० मध्ये काम सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले होते. तथापि, दरम्यानच्या काळात कोविड-१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव सुरु झाल्याने लॉकडाऊन परिस्थितीमुळे नमूद पूलाचे बांधकाम नियुक्त कंत्राटदार कंपनीस सुरु करता आले नाही. तथापि, सद्य:स्थितीत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडून परवानगी घेऊन प्रश्नाधीन मोडकाघर पुलाचे बांधकाम मे.मनिषा राज जेव्ही कंपनी यांचेकडून दिनांक २४ एप्रिल, २०२० पासून सुरु करण्यात आले आहे. प्रश्नाधीन मोडकाघर पूलाच्या बांधकामातील अंतर्भूत असलेल्या राफट फाऊंडेशनचे काम पूर्ण झाले असून ॲबटमेंट व पिअरचे काम प्रगतीत आहे व दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

दळखण (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्मशानभूमीची जागा निश्चित करण्याबाबत

(१६) २९४० (२९-०५-२०२०). श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दळखण (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या हद्दीत सुमारे ३ हजारावर लोकवस्ती असून दळखण मधील सर्व्हे क्र.१८० येथे ५ गुंठे जागेवर “मसनवट” या नावाने ७/१२ उतारा असतानाही प्रत्यक्षात सदरहू मसनवटीची जागा नेमकी कुठे आहे याबाबत प्रशासनाकडे माहिती नसल्याकारणाने अंत्ययात्रेसाठी नागरिकांना इतर ठिकाणी म्हणजे रेल्वे क्रॉसिंग करुन १ कि.मी. अंतरावरील खर्डी येथील स्मशानभूमीत जावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दळखण ग्रामपंचायतीने मसनवटीच्या जागेबाबत भूमी अभिलेख कार्यालयाकडे रितसर अर्ज करून स्मशानभूमीची जागा दाखवा म्हणून मागणी केली असता भूमि अभिलेख कार्यालयाकडून दळखण ग्रामपंचायतीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मशानभूमीसाठी राखीव जागेची निश्चित माहिती नसल्याकारणाने ग्रामपंचायतीला सुसज्ज स्मशानभूमी बांधता येत नाही, याप्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे व तहसिलदार, शहापूर यांचेकडे सरपंच, ग्रामपंचायत दळखण यांनी स्मशानभूमीच्या जागेबाबत माहिती उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दळखण ग्रामपंचायत हद्दीतील स्मशानभूमीच्या राखीव जागेची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) मौजे दळखण, ता.शहापूर येथील ग.नं. १८० या जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ सदरी मसनवट ग्रु.ग्रा.पं., दळखण अशी नोंद असून सदर जमीन स्मशानभूमीकरीता राखीव आहे.

सरपंच, ग्रामपंचायत दळखण यांनी तहसिलदार, शहापूर यांच्याकडे मौजे दळखण, ता.शहापूर येथील उक्त स्मशानभूमीच्या जागेची मोजणी करुन देण्याबाबत विनंती केली होती. त्यानुषंगाने सदर जमिनीची मोजणी करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे तहसिलदार, शहापूर यांनी उप अधीक्षक भूमि अभिलेख, शहापूर यांना कळविले आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, शहापूर यांच्याकडून दिनांक १७/०६/२०२० रोजी मसनवट जमिनीची मोजणी करुन अर्जदार ग्रामसेवक, ग्रामपंचायत दळखण यांना मोजणी नकाशाची “क” प्रत पुरविण्यात आली आहे.

परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत

(१७) २९७६ (२९-०५-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ६९२ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा पातळीवर जेथे जिल्हा रुग्णालय आहे तेथे वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याबाबत केंद्र शासनाचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत नियुक्त तज्ञ समितीव्दारे परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापनेच्या अनुषंगाने तपासणी करुन प्राथमिक अहवाल सादर केला असून सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (२२-०७-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत नियुक्त तज्ञ समितीव्दारे परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय स्थापनेच्या अनुषंगाने तपासणी करून प्राथमिक अहवाल शासनास सादर केला असून तो शासनाच्या विचाराधीन आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

खापरी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील दगडखाणी बंद करण्याबाबत

(१८) २९८४ (२९-०५-२०२०). श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खापरी (ता.शहापूर, जि.ठाणे) गावालगत मागील १ वर्षापासून भूसुरुंग स्फोटाव्दारे सुरु असलेल्या दगडखाणीमुळे गावातील हजारांहून अधिक घरांना

तडे जाऊन घरे कमकुवत व धोकादायक झाली आहेत, तसेच भुसुरूंग स्फोटामुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनीप्रदूषण होत असून पर्यावरणासही गंभीर धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी खापरी येथील दगडखाणी बंद करण्याबाबत स्थानिक शिक्षक व ग्रामस्थांनी मा.महसूल मंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे, जिल्हाधिकारी, ठाणे व तहसिलदार, शहापूर यांचेकडे मागील ६ महिन्यांपासून सातत्याने लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खापरी येथील दगडखाणी बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२०) : (१), (२) व (३) मौजे खापरी (ता.शहापूर, जि.ठाणे) या गावापासून २०० मीटरपेक्षा अधिक अंतरावर असलेल्या दगडखाणीत स्फोटामुळे सौम्य प्रमाणात आवाज होत आहे. मात्र कोणत्याही घरांना तडे गेल्याची बाब निदर्शनास आली नाही.

सदर दगडखाणीबाबत रा.सरळगांव, ता.मुरबाड येथील नागरिकाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाकडे केलेल्या तक्रारीनुसार जिल्हा खनिकर्म अधिकारी, ठाणे व संबंधित अधिकारी यांनी संबंधित तक्रारदार यांच्यासमवेत दिनांक १७/०१/२०२० रोजी स्थळपाहणी करण्यात आली आहे. मौजे खापरी येथील स.नं.३७/२ या जागेत गौण खनिजाचे उत्खनन हे जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाकडून दिलेल्या परवानगीनुसार तसेच शासनजमा केलेल्या स्वामित्वधनाच्या मर्यादेत झाले आहे. सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता झाल्याचे स्थळपाहणीत दिसून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रिलायन्स जियो कंपनीकडून दंडात्मक रकमेची वसूली करण्याबाबत

(१९) ३००० (०३-०६-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सुजितसिंह ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ७०२ ला दिनांक ५ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिलायन्स जियो इन्फो कॉम.लि., या कंपनीने केलेल्या अवैध गौण खनिज उत्खननापोटी रिलायन्स जियो या कंपनीच्या चल व अचल मालमत्तेची माहिती घेऊन दंडात्मक रकमेची वसूली करण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास कळविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार रिलायन्स जियो कंपनीकडून आर्थिक दंड वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई यांनी रिलायन्स जिओ कंपनीचे मुंबई येथील मालमत्ता जप्त करुन त्याची लिलाव प्रक्रिया पूर्ण केली आहे काय, याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई यांच्याकडून करण्यात आलेल्या कारवाईची सविस्तर माहिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिलायन्स जियो कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२८-०७-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) उक्त पत्रानुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ मधील कलम २६७ नुसार रुपये २५,९५,६३,७५०/- इतक्या रकमेची मागणीची नोटीस दिनांक ०६/०२/२०२० रोजी जिओ कंपनीच्या मुंबई येथील कार्यालयास बजाविण्यात आली आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने थकबाकीदार कंपनीने अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे अर्ज सादर केला असून अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक ३०/०६/२०२० पर्यंत उक्त रकमेच्या वसूलीस स्थगिती दिली आहे. सदर प्रकरणी अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्ह्यातील शहरालगतच्या महाविद्यालयाने केलेल्या क्षमतेपेक्षा जादाचे प्रवेश दिल्याबाबत

(२०) ३००३ (२८-०५-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७०६० ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहर व जिल्ह्यातील शहरांच्या लगत असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये क्षमतेपेक्षा अधिक देण्यात आलेले प्रवेश रद्द करण्यासाठी शिक्षणाधिकारी, परभणी यांनी भरारी पथकाची स्थापना करून तपासणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची बायोमॅट्रीक पध्दतीने उपस्थिती नोंदविण्याबाबतचा आदेशही काढला असून प्रवेश क्षमतेपेक्षा जादा प्रवेश दिलेल्या जिल्ह्यातील उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी संस्था व संस्था चालक तसेच कर्मचारी यांच्याविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२७-०७-२०२०) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) यासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), परभणी यांच्यास्तरावरुन चौकशी करण्यात आलेली असून जादा प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना इतर कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

'बालभारती' संस्थेतील तांत्रिक तसेच शैक्षणिक पदे विनाविलंब भरण्याबाबत

(२१) ३०११ (०२-०६-२०२०). श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या हाती दरवर्षी पाठयपुस्तके देणाऱ्या 'बालभारती' मधील तांत्रिक बाजू सांभाळण्याची जबाबदारी असलेल्या निर्मिती प्रमुखाकडे शैक्षणिकदृष्टया महत्वाचे असलेले बालभारतीचे संचालक पद तसेच पुस्तकातील मजकुराला अंतिम स्वरूप देणाऱ्या विशेषाधिकाऱ्याचे पद अशी अनेक महत्त्वाची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक जबाबदारी सांभाळण्यासाठी सध्या 'बालभारती' संस्थेकडे शैक्षणिक क्षेत्रातील पुरेसे मनुष्यबळ नसून संस्थेतील एकूण कर्मचारी संख्येपैकी बहुतांशी पदे ही तांत्रिकी तर शैक्षणिक पदे म्हणजेच विषयानुसार पुस्तकांतील मजकुरांची जबाबदारी असणारी पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालभारती संस्थेमध्ये विविध संवर्गातील एकूण किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी किती व कोणकोणती पदे किती कालावधीपासून रिक्त आहेत, तसेच सदरहू रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बालभारती संस्थेतील रिक्त असलेली तांत्रिक तसेच शैक्षणिक पदे विनाविलंब भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२८-०७-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) पाठ्यपुस्तक मंडळातील सरळसेवा संवर्गातील दिनांक ०१/०६/२०२० अखेरच्या मंजूर, कार्यरत व रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	संवर्ग	मंजूर	कार्यरत	रिक्त
१	अ	०६	०३	०३
२	ब	४२	२०	२२
३	क	१२३	०३	१२०
४	ड	१७५	६४	११९
	एकूण	३४६	९०	२५६

सामाजिक आरक्षण धोरणात झालेले बदल, बिंदूनामावली निश्चिती आदी कारणामुळे रिक्त पदे भरण्यात आलेली नाहीत.

(४) सरळसेवेच्या रिक्त असलेल्या पदापैकी ११३ पदांची भरतीप्रक्रिया राबवण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ग्रामीण भागातील अवैध मद्यनिर्मिती व मद्यविक्रीबाबत

(२२) ३०१८ (०२-०६-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २००३ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत हद्दीतील अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक व विक्री यावर प्रतिबंध आणण्याच्या दृष्टीने ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याबाबतचे आदेश सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यानच्या अर्धशासकीय पत्रान्वये परभणी जिल्ह्यात अशा किती ग्रामरक्षक दलांची स्थापना करण्यात आली आहे,

(३) असल्यास, ग्रामरक्षक दलाकडून अशा अवैध प्रकरणांना आळा घालण्याबाबत प्रत्यक्षात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील (२७-०७-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.
(२) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक १३/०१/२०२० च्या अर्धशासकीय पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत प्रत्येक गावात होणाऱ्या ग्रामसभेच्या विषयसूचीमध्ये ग्रामरक्षक दल स्थापन करणेबाबत आवश्यक ती यथायोग्य कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने परभणी जिल्ह्यातील ७०४ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामरक्षक दल स्थापन करण्याबाबत ठराव घेण्यात आलेले आहेत. अशा ग्रामपंचायतींना उपविभागीय दंडाधिकारी यांना ग्रामरक्षक दल नियम, २०१७ मधील तरतुदीनुसार ग्रामरक्षक दल स्थापनेची पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडून निर्देश देण्यात आले आहेत. परभणी जिल्ह्यात ग्रामरक्षक दल स्थापन करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

शालेय पोषण आहाराचे अनुदान महिला बचत गटांच्या खात्यात जमा करण्याबाबत

(२३) ३०३४ (०२-०६-२०२०). श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण संचालकांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये शालेय पोषण आहाराचे महिला बचत गटांना देण्यात येणारे अनुदान वजनानुसार न देता प्रति विद्यार्थी देण्याबाबत, तसेच शालेय पोषण आहाराची देयके शाळांच्या खात्यावरून महिला बचत गटांच्या खात्यावर जमा करण्याबाबत घेतलेला निर्णय अन्यायकारक असल्याने हे परिपत्रक रद्द करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, तसेच राज्यातील महिला बचत गटाच्या प्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांकडे माहे मार्च, २०२० च्या तिसऱ्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीच्या अनुषंगाने शिक्षण संचालकांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ रोजी जाहीर केलेले परिपत्रक रद्द करून महिला बचत गटांना शालेय पोषण आहाराचे अनुदान प्रति विद्यार्थी देण्याबाबत तसेच सदरहू अनुदान थेट त्यांच्या बचत खात्यात जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२८-०७-२०२०) : (१) हे खरे आहे.

(२) केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत जानेवारी, २०२० पासून पुरवठा केलेल्या तयार आहाराची वजनानुसार देय रक्कम संबंधित संस्थाच्या बँक खात्यावर थेट जमा करण्याचा निर्णय जानेवारी, २०२० मध्ये घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कृषी पर्यटन धोरणाच्या प्रस्तावाबाबत

(२४) ३०३८ (२८-०५-२०२०). श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ५३३ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूरी दिलेल्या केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयाच्या "चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS)" मध्ये एकूण १२ सेवांचा समावेश असून त्यामध्ये पर्यटन व आदरातिथ्य ही एक सेवा समाविष्ट असून त्यानुषंगाने पर्यटन विभागाकडून रुपये १५८१.७५ कोटीचे प्रस्ताव केंद्रीय वाणिज्य व औद्योगिक मंत्रालयास पाठविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव चॅम्पियन सर्व्हिसेस सेक्टर स्किम (CSSS) या योजनेच्या प्रस्तावित मार्गदर्शक तत्वामध्ये बसत नसल्याचे केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात कृषी पर्यटन धोरण राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच सदरहू प्रस्तावाच्या मान्यतेबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.आदित्य ठाकरे (१०-०८-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रस्तावित कृषी पर्यटन धोरण शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मीरा-भाईंदर आणि नायगाव खाडीच्या पात्रात होणारे अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत

(२५) ३०६० (०३-०६-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईंदर आणि नायगाव खाडीच्या पात्रात माहे फेब्रुवारी, २०२० पासून रात्री १२ ते पहाटे ५ च्या रात्रीच्या अंधारात संक्शन पंपाव्दारे ५ ते ६ बोटींच्या साहाय्याने वाळू माफियांकडून अवैधरित्या सर्रासपणे मोठ्या प्रमाणावर वाळू उत्खनन होत असल्याने मीरा-भाईंदर आणि वसईला जोडणाऱ्या रेल्वे पूलाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अवैध वाळू उत्खननाबाबत तेथील नागरिकांनी तसेच मच्छीमारांनी जिल्हाधिकारी, पालघर, तहसिलदार, वसई, तसेच स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये रितसर तक्रारी नोंदविल्यानंतरही वाळूमाफिया विरोधात कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या वाळू माफियावर व त्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन वाळू उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२८-०७-२०२०) : (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

महाकोष या महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवरील आकडेवारीबाबत

(२६) ३०६३ (२९-०५-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.विनायकराव मेटे, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाकोष या महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवरील आकडेवारीनुसार दिनांक ९ ते ३१ मार्च, २०२० या कालावधीत रुपये ३०,००० कोटीपेक्षा अधिक रक्कम शासनाने खर्च करुनही सार्वजनिक आरोग्य विभागासाठी केवळ ५० टक्के रक्कम खर्च केली, हे खरे आहे काय
(२) असल्यास, रुपये ३०,००० कोटीपेक्षा अधिक रक्कम सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण व कृषी विभागांसाठी खर्च न करता इतर विभागांसाठी खर्च करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कोरोनाबाधित रुग्णांसाठी उक्त रक्कम खर्च न केल्याने महाराष्ट्रात सर्वाधिक कोरोनाबाधित रुग्णांमध्ये वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (२९-०७-२०२०) : (१) अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणाली नुसार दिनांक ९ ते ३१ मार्च, २०२० या कालावधीत शासनाने एकूण रुपये ३९,१०२ कोटी एवढी रक्कम खर्च केलेली आहे. तसेच, सन २०१९-२०२० या वर्षामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाला सुधारित अंदाजानुसार रुपये १०,६८६ कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता व यापैकी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर रुपये ९,३९० कोटी एवढा खर्च केलेला असल्याचे दिसून येते व हा खर्च सुधारित अंदाजाच्या ८७.८७% इतका आहे.

(२) राज्याच्या एकूण अर्थसंकल्पापैकी प्रत्येक विभागाला उपलब्ध करून दिलेल्या अर्थसंकल्पीत निधीच्या मर्यादेत खर्च करावा लागतो. सन २०१९-२०२० मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाला रुपये १०,६८६ कोटी, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाला रुपये ४,४९१ कोटी आणि कृषी विभागाला रुपये १०,३१२ कोटी एवढा निधी खर्च करण्यासाठी उपलब्ध असल्याने त्यापेक्षा जास्त खर्च होणे अपेक्षित नाही.

(३) नाही.

कोरोना रुग्णांची झालेली वाढ संसर्गामुळे झालेली आहे. कोरोनाबाधित रुग्णांसाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मढ (ता.मुरबाड, जि.ठाणे) आदिवासी आश्रमशाळा विद्यार्थ्यांना मुलभूत सोयी सुविधा मिळणेबाबत

(२७) ३०६५ (२८-०५-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विनायकराव मेटे, श्री.रमेशदादा पाटील : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मढ (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील आश्रमशाळेत एकूण ३६२ विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यापैकी १८७ विद्यार्थी निवासी आहेत, मात्र या विद्यार्थ्यांना गेली अनेक वर्षापासून भाडे भरून एका पोल्ट्री फार्ममध्ये शिक्षण घ्यावे लागत आहे, तसेच राहण्याची सोय सुध्दा पोल्ट्री फार्ममध्ये करण्यात

आलेली असून त्या विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधांपासून वंचित होऊन अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने संबंधित आश्रमशाळेसाठी पर्यायी जागा उपलब्ध करून दिली असून सुध्दा शाळेचे बांधकाम करण्यात येत नाही, त्याला एकमेव कारण म्हणजे पोल्ट्री मालकाला दरमहा रुपये ४३ हजार ८९८ इतके भाडे मागील अनेक वर्षापासून मिळत असल्याने नवीन इमारतीच्या बांधकामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाले आले, त्यामुळे शासन जरी विद्यार्थ्यांकरीता लाखो रुपये खर्च करीत असले तरी, सदरहू विद्यार्थ्यांना नाईलाजास्तव दयनीय अवस्थेत राहण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पर्यायी जागेपर्यंत रस्ता सुध्दा झाला असून आश्रमशाळेच्या बांधकामासाठी १०.४८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे तसेच या आदिवासी आश्रमशाळेतील २ स्वयंपाकीच्या व एक सुरक्षारक्षकाची जागा रिक्त आहे, आश्रमशाळेत ६ शिक्षक हे तात्पुरत्या स्वरूपात तासिकावर काम करीत असून त्यांना दरमहा रुपये १३ हजार १२५ इतक्या तुटपुंज्या पगारावर काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (२८-०७-२०२०) : (१) हे खरे नाही. सदर आश्रमशाळेमधील एकूण ३६२ विद्यार्थ्यांपैकी १४० विद्यार्थी निवासी राहतात. आश्रमशाळेसाठी तीन इमारती भाडेतत्वावर घेण्यात आल्या आहेत. त्यामध्ये १० वर्ग खोल्या, मुख्याध्यापक कार्यालय, मुले व मुलींच्या निवासासाठी स्वतंत्र हॉल आहेत.

(२) हे खरे नाही. आश्रमशाळेचे बांधकाम सुरु असून बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आश्रमशाळा हस्तांतरित करण्यात येणार आहे.

(३) रिक्त पदावर शासनाने विहित केल्याप्रमाणे मानधनावर शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नियामकांकडून परीक्षकांकरीता नियोजन करण्याबाबत

(२८) ३०९१ (२८-०५-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे रेड झोनमध्ये असल्याने नगरपालिका, महानगरपालिका यांच्यामध्ये पूर्व/पश्चिम आवश्यकतेनुसार शाळांची स्वीकृती केंद्र म्हणून व्यवस्था करून त्या परिसरातील परीक्षकांना जवळील सेंटरला तपासलेली उत्तरपत्रिका जमा करण्यास सांगितल्यास वेळ व खर्चाची बचत होण्याबाबत विभागाकडून आदेश निर्गमित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांचे आरोग्य व कोविड-१९ चा धोका लक्षात घेता बोर्ड नियामकांकडून पेपर जमा करणार असून त्याचधर्तीवर परीक्षकांकरीता नियोजन करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने दिनांक ८ मे, २०२० रोजी सचिव, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नवी मुंबई यांना निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२७-०७-२०२०) : (१) नाही. तथापि, नियामकांकडून उत्तरपत्रिका संकलनासाठी मुंबई विभागीय मंडळाकडून संकलन केंद्र व कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) परीक्षकांची जास्त संख्या विचारात घेता, मुंबई विभागीय मंडळाने निश्चित केलेल्या केंद्रांवर नियामकांकडून उत्तरपत्रिका संकलित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निर्देशकांना सेवेत कायम करणेबाबत

(२९) ३१३३ (०२-०६-२०२०). श्री.नागोराव गाणार, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०१० च्या आदेशानुसार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ३३४ निर्देशकांना दोन वर्षासाठी नियुक्ती देण्यात आल्यानंतर दोन वर्षाची मुदतवाढ देवून एकूण चार वर्षाच्या सेवेनंतर सन २०१४ मध्ये त्यांना कार्यमुक्त करण्यात आले, कार्यमुक्तीनंतर पुन्हा सर्व ३३४ निर्देशकांना मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने सेवेत घेण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंत्राटी पध्दतीवर ३३४ कार्यरत निर्देशकांना राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये रिक्त असलेल्या पदांवर नियमित सेवेत सामावून देण्याबाबतची शिफारस मंत्रिमंडळ उपसमितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील निर्देशकांची रिक्त असलेली ७०० पदे स्पर्धा परीक्षेव्दारा भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे मागील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या अनुभव प्राप्त कंत्राटी निर्देशकांवर अन्याय होत असल्याने त्यांच्यात तीव्र नाराजी निर्माण झाली असून उक्त ३३४ कंत्राटी पध्दतीवर कार्यरत निर्देशकांना नियमित सेवेत सामावून घेवून उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबत शासन फेरविचार करून तसेच त्याबाबतचे सुधारित आदेश काढून अन्यायग्रस्त निर्देशकांना न्याय देणार आहे काय असल्यास कधीपर्यंत ?

श्री.नवाब मलिक (२४-०७-२०२०) : (१) व २) होय, हे खरे आहे.

(३) होय, अंशत: खरे आहे,

(४) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

जगबुडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) नदीवर बांधण्यात येणारे न्यू मांडवे धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३०) ३१४६ (०२-०६-२०२०). श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विनायकराव मेटे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाणीटंचाईच्या दुष्टचक्रात अडकलेल्या जनतेला बाहेर काढण्यासाठी (ता.खेड, जि.रत्नागिरी) आठ धरण प्रकल्पांची कामे सुरु करण्यात आलेली असतानाही एक-दोन धरणाचा अपवाद वगळता एकाही धरणाचे काम पूर्ण झालेले नाही, दहिवली आणि शिंगटी गावाच्या परिसरात जगबुडी नदीवर बांधण्यात येणारे न्यू मांडवे धरण त्यापैकीच एक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यू मांडवे धरणाचे काम मे.बालाजी कंन्स्ट्रक्शन या ठेकेदाराकडून दिनांक २० नोव्हेंबर, १९९५ रोजी सुरु करण्यात आले परंतु प्रकल्पग्रस्तांच्या समस्या मार्गी न लागल्याने एक वर्षानंतर दिनांक १८ नोव्हेंबर, १९९६ ते दिनांक ७ जानेवारी, १९९७ (५१ दिवस) या कालावधीत काम बंद ठेवावे लागले. त्यानंतर दिनांक ७ जानेवारी, १९९७ रोजी सुरू झालेले काम दिनांक १० नोव्हेंबर, १९९८ पासून ते दिनांक ३१ जानेवारी, १९९९ पर्यंत पुन्हा बंद ठेवावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००२ मध्ये धरणाचे काम पुन्हा सुरू करण्यात आले, मात्र धरणामुळे निर्माण झालेल्या वीज आणि पाणी वितरण व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाल्याने, ग्रामस्थांनी पुन्हा धरणाचे काम बंद पाडले तद्नंतर सन २००८ साली बंद पडलेले काम सन २०११ मध्ये पुन्हा सुरु करण्यात आले. सन २०१५ अखेर धरणाचे काम अगदी धिम्या गतीने सुरू होते. मात्र सदर काम सन २०१५ साली पुन्हा बंद पडले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, "आधी पुनर्वसन आणि नंतर धरण" हे शासनाचे धरणाबाबतचे धोरण अवलंबिले गेले असते तर धरणाचे काम पुन्हा पुन्हा बंद पाडण्याची वेळ ग्रामस्थांवर आली नसती, मात्र प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे या धरणाच्या कामामध्ये सुरुवातीपासूनच अडथळे येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर धरणाच्या कामास २५ वर्षांहून अधिक कालावधी लोटल्यामुळे धरणाच्या अंदाजित खर्चात वाढ झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर न्यू मांडवे धरणाचे बंद पडलेले काम विनाविलंब सुरू करून ते पूर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (३०-०७-२०२०) : (१) होय, खरे आहे.

या प्रदेशांतर्गत खेड तालुक्यात नातुवाडी मध्यम पाटबंधारे प्रकल्प, शिरवली, कोंडीवली, आवाशी लघुपाटबंधारे आणि पिंपळवाडी लघुपाटबंधारे पूर्ण झालेले ५ प्रकल्प. तसेच पोयनार, शेलारवाडी, तळवट, न्यू मांडवे हे बांधकामाधीन ४ लघुपाटबंधारे प्रकल्प आहेत.

न्यू मांडवे हा प्रकल्प जगबुडी नदीच्या स्थानिक नाल्यावर शिंगरी तर्फे नातू ह्या गावाच्या सिमेवर बांधण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय.

तथापि, प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्याची बाब खरी नाही. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मांडवे आणि तळे या गावात करण्यात येत असून, मार्च, २०२० अखेर पुनर्वसनावर रुपये १६६.०९ लक्ष इतका खर्च झाला आहे. पुनर्वसन गावठाणातील देय १८ नागरी सुविधांपैकी मांडवे आणि तळे या गावात प्रत्येकी ६ सुविधांची कामे पूर्ण झाली असून निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित सुविधा पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) होय, हे खरे आहे.

प्रकल्पाचा मंजूर सुधारित प्रशासकीय मान्यता रुपये ५०७६.५२ लक्ष असून रुपये ४२९९.०७ लक्ष इतका खर्च झाला आहे. धरणाचे सांडवा, पुच्छ कालावा व सिंचन तथा विद्युत विमोचकाचे सविस्तर संकल्पन माहे मार्च, २०२० मध्ये प्राप्त झाले असून त्यानुसार तसेच भाववाढीमुळे प्रकल्पाच्या खर्चामध्ये वाढ होणार आहे. त्यानुसार सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

(६) सद्य:स्थितीत प्रकल्पाची कामे निधी उपलब्धतेनुसार मंजूर सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत प्रगतीपथावर आहेत.

प्रकल्पाच्या सर्व घटक भागांची संकल्पने प्राप्त झाल्यानुसार प्रकल्प पूर्ण करण्यासाठी उर्वरित कामाची अद्ययावत किंमत निश्चित करण्याचे काम सूरू आहे.

तसेच शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र. सिंचन २०१५ /प्र.क्र.२४/ २०१५/ जसं (धोरण) दिनांक ९/०६/२०१६ अन्वये प्रसृत झालेल्या बंदिस्त नलिका वितरण प्रणाली धोरणानुसार प्रकल्पाच्या कालव्याची कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत. त्यानुसार प्रकल्पाच्या सुधारित सु.प्र.मा.ला मंजूरी दिल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार धरणाचे व कालव्याचे काम २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली अंतर्गत एमएससीआयटी बोगस प्रशिक्षणार्थी दाखवून अपहार केल्याबाबत

(३१) ३१८० (०२-०६-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली अंतर्गत एमएससीआयटी प्रशिक्षणात बोगस प्रशिक्षणार्थी दाखवून लाखो रूपयांचा अपहार केल्याबाबतची बाब दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरूध्द तात्काळ कारवाई करण्याची तसेच राज्यातील इतरही आदिवासी प्रकल्पामधील कारभाराची सुध्दा चौकशी करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (२४-०७-२०२०) : (१) होय.
(२) होय.
(३) सन २००४-२००९ या कालावधीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये झालेल्या अनियमिततेसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार न्या.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली अंतर्गत एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण योजनेतील गैरव्यवहारासंदर्भात प्रकल्प कार्यालयातील तत्कालीन प्रकल्प अधिकारी व ०८ संस्थेंविरुध्द पोलीस ठाणे गडचिरोली येथे दिनांक २१/१२/२०१९ रोजी प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पोलिसांमार्फत पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वीज महापारेषणच्या माध्यमातून वितरणमध्ये विजेची गळतीत वाढ होत असल्याबाबत

(३२) ३१८८ (०२-०६-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.गोपीचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.सुरेश धस : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वीज निर्मिती केंद्रांमधून तयार केली जाणारी वीज महापारेषण उच्चदाब वीज वाहिन्यांच्या माध्यमातून (स्टेट ग्रीड) वीज वितरण कंपन्यांपर्यंत वाहत आणत असून माहे जानेवारी, २०२० पासून सदरहू वीज वाहून आणतांना ४२९ दशलक्ष युनिट विजेची गळती झाली असून गत वर्षीच्या तुलनेत गळतीचे प्रमाण जास्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज निर्मिती प्रकल्पात तयार झालेली वीज महापारेषणच्या माध्यमातून महावितरण, टाटा पावर, बेस्ट आणि अदानी इलेक्ट्रिसिटी या वीज वितरण कंपन्यापर्यंत पोहोचवतात व त्यासाठी राज्यभरात हजारो किलोमीटरच्या उच्चदाब वीज वाहिन्या उभारलेल्या असून त्यांच्या

माध्यमातून वीज वाहन करत असताना आतापर्यंत बीडमध्ये टाकलेल्या एकूण विजेच्या अडीच ते तीन टक्के एवढी कमी गळती होत होती, तर माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ग्रीडमध्ये टाकलेल्या एकूण विजेच्या २.८६ टक्के एवढी कमी वीज गळती झाली होती मात्र त्यानंतर गळतीमध्ये सातत्याने वाढ होऊन माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये ३.१३ टक्के, माहे डिसेंबर, २०१९ मध्ये ३.३७%, तर माहे जानेवारी, २०२० मध्ये ३.२०% एवढ्या मोठ्या प्रमाणात वीज गळती झालेली असून ती दिवसेंदिवस वाढीस लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज निर्मिती कंपन्या ग्रेडमध्ये टाकलेली वीज उच्चदाब वीज वाहिन्यांमधून नेताना जेवढ्या विजेची गळती होते त्याची किंमत ग्राहकांना चुकवावी लागते वीज निश्चित करताना ग्रीडमधून गळती होणाऱ्या विजेची भरपाई ग्राहकांकडून केली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या वीज गळती प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वीज गळतीस परिणामकारक आळा घालण्याचेदृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. नितिन राऊत (२७-०७-२०२०) : (१) व (२) MERC च्या आदेशांनुसार सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० यांच्यासाठी अनुक्रमे ३.१८% व ३.११% राज्य पारेषण हानी निश्चित केलेली होती. तसेच सन २०२०-२०२१ ते सन २०२४-२०२५ या कालावधीसाठी ३.१८% निश्चित केलेली आहे.

ऑक्टोबर, २०१९ मध्ये २.८७%, नोव्हेबर, २०१९ मध्ये ३.१३% व डिसेंबर, २०१९ मध्ये ३.२७% तसेच सन २०२० मध्ये जानेवारीमध्ये ३.२०%, फेब्रुवारीमध्ये ३.११% व मार्च मध्ये ३.१०% इतकी पारेषण हानी झालेली आहे.

(३) महावितरण कंपनीने वीज नियामक आयोगाकडे केलेल्या याचिकेची आयोगातर्फे योग्य पडताळणी करुन त्यांनी मंजूर केलेल्या पारेषण हानी सह पारेषण खर्च मंजूर केला जाऊन तो वीज दरात समाविष्ट होतो. सदर मंजूर आदेशानुसारच ग्राहकांना वीज दर आकारले जातात.

(४) पारेषण हानी कमी करण्याच्या दृष्टीने शेतीपंपासाठी प्रतिक्रियात्मक ऊर्जेचा वापर कमी करण्यासाठी कपॅसिटर बसविणे, नव्या वाहिनीची उभारणी करणे, नविन पारेषण उपकेंद्रांची उभारणी करणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वसई (जि.पालघर) मधील गिरीज येथील शासकीय जागेवर तिवरांच्या झाडांची कत्तल करण्यात येत असल्याबाबत

(३३) ३२१० (२८-०५-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) मधील गिरीज येथील सर्वे क्रमांक १४२ या शासकीय जागेवर भूमाफियांनी अतिक्रमण करून या ठिकाणी असलेल्या तिवरांच्या झाडांची जेसीबीमार्फत कत्तल करण्यात आली असल्याचे दिनांक ७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास नि्दर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदा उत्खनन करून पाण्याचा निचरा होण्याचे नैसर्गिक मार्गदेखील बंद केल्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी आजूबाजूला असलेल्या खेड्यापाड्यात शिरून पूरस्थिती निर्माण होण्याची भिती स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित भूमाफियांना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, वि्लंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (१८-०८-२०२०) : (१), (२) व (३) मौजे गिरीज येथील स.नं. १४२ या खार जमिनीवर तिवरांच्या झाडांची कत्तल करुन अतिक्रमण केल्याबाबत तहसिलदार, वसई यांच्याकडे दिनांक १३/०४/२०२०, दिनांक ५/०५/२०२० व दिनांक २५/०५/२०२० रोजी तक्रार प्राप्त झाली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, वसई यांच्यामार्फत चौकशी करण्यात आलेली असता, शासकीय जमिनीवर बेकायदेशीररीत्या अतिक्रमण करुन तिवराच्या झाडांची कत्तल केल्यामुळे तसेच जेसीबीच्या सहाय्याने उत्खनन करुन नैसर्गिक खाडीच्या पाण्याचा प्रवाहाचा मार्ग बदलल्याचे दिसून आले.

याप्रकरणी श्री.जितेंद्र शंकर मेहेर व श्री.घनश्याम सुरत राभर यांच्या विरोधात दिनांक ५/०५/२०२० रोजी वसई पोलीस स्टेशन येथे पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ व भारतीय दंड संहिता, १८६० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

संचारबंदीच्या काळात शिक्षकांना कामावर पोहचण्यासाठी व्यवस्था करण्याबाबत

(३४) ३२५२ (०२-०६-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता १० वी व १२ वीचा निकाल मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दिनांक १० जून, २०२० पूर्वी घोषित करणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरीता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने राज्यातील सर्व महानगरपालिका, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिनांक ८ मे, २०२० च्या एका पत्राव्दारे सदरहू परीक्षेसंबंधातील अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना संचारबंदी कालावधीत अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रवासाकरीता सुट देण्यात यावी, असे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पत्रात परिक्षेसंबंधातील कर्मचारी वर्गास पास मिळवण्यासाठी कोणाशी संपर्क करायचा व कामाच्या ठिकाणापर्यंत कसे पोहोचायचे ह्याचा कोणताही उल्लेख नसल्याने सर्व कर्मचारी वर्गामध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणावर पोहचण्यासाठी कोणती व्यवस्था केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२७-०७-२०२०) : (१) होय.
(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये, परीक्षेच्या कामाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना काही अटी व शर्तीच्या अधिन राहून संचारबंदीतून सूट देण्यात यावी किंवा प्रवासाकरीता परवानगी/पास देण्यात यावेत, अशा सूचना राज्यातील सर्व महानगरपालिका आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या होत्या. याअनुषंगाने मुंबई विभागीय मंडळाने यासंदर्भात संबंधित महानगरपालिका, पोलीस आयुक्त व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना यासंदर्भात दिनांक ०८/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रवासाकरीता सूट देण्याची विनंती केली आहे.
(३) व (४) इयत्ता १० वी १२ वीच्या उत्तरपत्रिका संकलनाच्या कामाचे नियोजन करण्यात येऊन त्याप्रमाणे विभागीय मंडळांकडून जिल्हा/तालुकानिहाय संकलन केंद्र तयार करुन नियमाकांकडून उत्तरपत्रिका स्विकारण्यात आल्या आहेत. परीक्षेसंबंधित कर्मचारी वर्गामध्ये पास मिळणेसाठी कोणतीही अडचण किंवा गोंधळाची स्थिती निर्माण झाली नाही अथवा तशा तक्रारी विभागीय मंडळाकडे प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच स्थानिक स्तरावरील व इतर काही नियमांकांनी स्वत: विभागीय मंडळ कार्यालयात येऊन उत्तरपत्रिका जमा केलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

दापोली, मंडणगड व खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बौध्दवाड्यांतील विकास कामांबाबत

(३५) ३२६७ (२९-०५-२०२०). श्री.रामदास कदम : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली, मंडणगड व खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बौध्दवाड्यांतील विकासकामांबाबत खालील ५ कामांप्रमाणे एकूण १८ कामांसाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामे सावरी येथे कॉजवे बांधणे, बहिरवली येथे पाण्याची साठवण टाकी बांधणे, निगडी बौध्दवाडी रस्ता डांबरीकरण करणे, कोनवली बौध्दवाडी येथे पाण्याची टाकी दुरुस्त करणे तसेच घराडी जिल्हा परिषद शाळा ते बौध्दवाडी रस्ता डांबरीकरण करणे इत्यादी कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धनंजय मुंडे (२१-०७-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) प्रस्तुत कामांना शासन निर्णय, दिनांक २६ मार्च, २०२० अन्वये मंजुरी देण्यात येऊन सदर कामांच्या किंमतीच्या एकूण रकमेच्या ४०% प्रमाणे तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती ते सूरत व अमरावती ते अकोला या रस्त्यांचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

(३६) ३२८४ (०३-०६-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ४७२१४ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती ते सूरत रस्ता चौपदरीकरण करण्याचे कामास शासनामार्फत गत ७ वर्षापूर्वी मंजुरी प्रदान होवूनही पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती ते अकोलापर्यंतचे काम सुध्दा फक्त ४० टक्के पूर्ण झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त कामे पूर्ण न करता रस्त्याच्या दोन्ही बाजूला खोदकाम केल्यामुळे अपघाताचे प्रमाणात वाढ झाल्याचे सुध्दा निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच उपरोक्त कामाकरीता ३ कंत्राटदारांना वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे बदलण्यात आले असून सद्य:स्थितीत कोणत्या कंत्राटदाराला काम देण्यात आलेले आहे व उपरोक्त काम किती वर्षात पूर्ण होणार आहे, याबाबत करारनामा झालेला आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन उपरोक्त काम ठरल्यावेळेत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (२०-०७-२०२०) : (१) हे खरे असल्याचे प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

अमरावती ते सूरत रस्ता चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.
(२) अमरावती ते अकोला या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे २० टक्के काम पूर्ण झाल्याचे प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याचे काम अपूर्ण असून सद्य:स्थितीत अस्तित्वातील दुपदरी रस्त्यावरुन वाहतूक सुरु आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघात झाल्याची कोणतीही तक्रार निदर्शनास आलेली नाही. परंतु रस्त्याच्या दुतर्फा तटबंदीमुळे पाण्याचा निचरा होण्याची समस्या निर्माण झाल्याची बाब सप्टेंबर, २०१९ मध्ये निदर्शनास आल्यानंतर रस्ता गतीशील ठेवण्याच्या दृष्टीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत दुरुस्ती व देखभाल करण्याचे काम हाती घेवून सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत

ठेवण्यात आल्याचे प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

(४) प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,नागपुर यांनी अमरावती ते चिखली या रस्त्याचे काम खालीलप्रमाणे चार पॅकेजमध्ये कंत्राटदारांस देण्यात आले असल्याचे कळविले आहे.

पॅकेज १ :- कि.मी.१६६.०० ते कि.मी.१२०.०० या रस्त्याचे काम मेसर्स राजपथ इन्फ्राकॉन प्रायव्हेट लि.-इगल इन्फ्रा इंडिया लि. या कंत्राटदारांस देण्यात आले आहे.

पॅकेज २ :- कि.मी.१२०.०० ते कि.मी.२७०.०० या रस्त्याचे काम मेसर्स राजपथ इन्फ्राकॉन प्रायव्हेट लि.-इगल इन्फ्रा इंडिया लि. या कंत्राटदारांस देण्यात आले आहे.

पॅकेज ३ :- कि.मी. २७०.०० ते कि.मी. ३१५.०० या रस्त्याचे काम मेसर्स मॉन्टेकार्लो लि. कंत्राटदारांस देण्यात आले आहे.

पॅकेज ४ :- कि.मी.३१५.०० ते कि.मी.३६०.०० या रस्त्याचे काम मेसर्स कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि.या कंत्राटदारास देण्यात आले आहे.

वरील चारही कामांसाठी स्वीकृती पत्र दिनांक ०७/०२/२०२० रोजी जारी करण्यात आले असून करारनाम्याबाबतचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी दोन वर्षाचा आहे.

(५) कंत्राटदाराच्या पूर्वनिर्धारणानुसार चौपदरीकरणाचे काम अंतिम करण्यासाठी कंत्राटदारास दोनदा सवलत देण्यात आली असल्याचे प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत

(३७) ३२८९ (०३-०६-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यामध्ये वाळू माफियांचे प्रमाण वाढत असून वाळू माफियांनी दिनांक २८ एप्रिल, २०२० रोजी अकोला (जि.अकोला) तालुक्यात पत्रकार पद्माकर लांडे यांच्यावर हल्ला करुन ते गंभीर जखमी झाले

आहे, तसेच शेगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात वाळू माफियांनी पोलीस शिपायास वाहनाने उडवून गंभीररित्या जखमी केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त वरील दोन्ही प्रकरणी शासनाने वाळू माफियांवर कोणतीही कारवाई केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाळू माफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२८-०७-२०२०) : (१) अशी बाब निदर्शनास आली आहे.
(२) व (३) अकोला तालुक्यातील पद्माकर लांडे यांना झालेल्या मारहाण प्रकरणी पोलीस ठाणे, अकोट येथे आरोपीविरुध्द दिनांक २८/४/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सदर आरोपीविरुध्द वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणी तहसिलदार, अकोला यांनी दिनांक २३/४/२०२० रोजी रुपये १,१६,८३३/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश पारीत केले आहेत.

शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यात माटरगांव ते वरद मार्गावर दिनांक २९/४/२०२० रोजी अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्पर चालकाने पोलीस शिपायास धडक दिल्याप्रकरणी जलंब पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित आरोपीना अटक करण्यात आली आहे. तसेच गुन्ह्यातील वाहन जप्त करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमधील प्रवेश प्रक्रियेबाबत

(३८) ३३३९ (०२-०६-२०२०). श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पध्दतीने होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यास अनेक अडचणी येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता ११वी ची केंद्रीय पध्दतीची प्रवेश प्रक्रिया रद्द करून कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्यास्तरावर देण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२७-०७-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) बृहन्मुंबई व पुणे सोडून इतर मनपा ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर ऑफलाईन प्रक्रिया राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी तसेच प्रवेश प्रक्रिया कार्यक्षमपणे राखविण्यासाठी शासनस्तरावरुन यथायोग्य कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय आदिवासी आश्रमशाळा सुरुडी (ता.आष्टी, जि,बीड) येथे तासिका बेसवर/रोजंदारीवर प्रतिनियुक्त्या केल्याबाबत

(३९) ३३४७ (२८-०५-२०२०). श्री.सुरेश धस : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय आदिवासी आश्रमशाळा सुरुडी (ता.आष्टी, जि,बीड) येथील आदिवासी मुलांसाठी असलेल्या शाळेत सन २०१९-२०२० मध्ये १७० मुले शिक्षण घेत असून या शाळेतील शिपाई ते माध्यमिक शिक्षकापर्यंतचे अनेक कर्मचारी हे वर्षानुवर्ष प्रतिनियुक्तीवर इतर शाळेत किंवा प्रकल्प कार्यालयात कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिपाई, चौकीदार, कामाठी, अधीक्षक अनेक माध्यमिक व प्राथमिक शिक्षक हे इतरत्र प्रतिनियुक्तीवर असल्याने त्यांच्या जागेवर तासिका बेसवर तसेच रोजंदारीवर अनेक कर्मचारी घेण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेकांच्या तासिका बेसवर तसेच रोजंदारीवर प्रतिनियुक्त्या केल्यामुळे शालेय गुणवत्तेवर व व्यवस्थापनावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार २०२०-२०२१ या वर्षामध्ये उक्त आश्रमशाळेतील वर्षानुवर्ष इतरत्र असलेल्या सर्व प्रतिनियुक्त्या रद्द करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०७-०८-२०२०) : (१), (२), (३) व (४) शासकीय आश्रमशाळा, सुरुडी, ता.आष्टी, जि.बीड ही माध्यमिक शाळा असून सदर आश्रमशाळेची इमारत धोकादायक स्थितीत असल्याने सदरची आश्रमशाळा दिनांक १७/१०/२०१७ रोजी शासकीय आश्रमशाळा, थेटेगव्हाण (कांदेवाडी), ता.धारुर, जि.बीड येथे पूर्णत: स्थलांतरीत करण्यात आली होती. सन २०१९-२०२० या शैक्षणिक सत्रातील दुसऱ्या सत्रामध्ये सुरुडी येथील आश्रमशाळा थेटेगव्हाण येथून आष्टी, जि.बीड येथे भाड्याच्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आली.

सदर शाळेच्या स्थलांतरामुळे काही कर्मचारी अगोदरच प्रतिनियुक्तीवर असल्याने संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून प्रकल्प कार्यालयाने केलेल्या प्रतिनियुक्त्या रद्द केलेल्या नव्हत्या. परंतु आता दिनांक ०५/०६/२०२० च्या आदेशान्वये कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या रद्द केल्या आहेत. सन २०१९-२०२० मध्ये शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सुरुडी येथे २३३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर आश्रमशाळेमध्ये नियमित १७ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आहेत. पदभरतीस सामान्य प्रशासन विभागाची स्थगिती असल्याने माध्यमिक शिक्षक-४, पदवीधार प्राथमिक शिक्षक-१ व प्राथमिक शिक्षक-१ असे एकूण ६ शिक्षक तासिका तत्वावर नेमण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळातील शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

(४०) ३३५० (२८-०५-२०२०). श्री.कपिल पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक ५३८ ला दिनांक १६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतरही सामाजिक न्याय विभागाच्या तालुकास्तरीय शासकीय निवासी शाळा वा दिव्यांग शाळा (अपंग) यांना तो लागू झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय निवासी शाळांना नवोदय विद्यालयाप्रमाणे वेतन वित्त विभागाने सहमती न दिल्यामुळे हा वेतन आयोग प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सामाजिक न्याय विभागातील तालुकास्तरीय निवासी शाळा व दिव्यांग शाळांना तात्काळ सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धनंजय मुंडे (१९-०८-२०२०) : (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) शासकीय निवासी शाळा तसेच अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

डोणगांव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) परिसरातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत

(४१) ३३६३ (२९-०५-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृध्दी महामार्गाच्या बाजूला सोडलेल्या सर्व्हिस रोडमधून गौण खनिज उत्खनन करणे व नंतर माती टाकून खड्डे बुजविण्याचा प्रकार डोणगांव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) परिसरात सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेकेदाराने शेलगाव देशमुख रोडवर एका शेतात विना परवाना महामार्गासाठी अवैध गौण खनिज उत्खनन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी ठेकेदारावर कारवाई करुन अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२८-०७-२०२०) : (१), (२) व (३) मौजे डोणगाव, ता.मेहकर जि.बुलढाणा येथे समृध्दी महामार्गाच्या बाजूला सोडलेल्या सर्व्हिस रोडमधून गौण खनिजाचे उत्खनन करणे व नंतर माती टाकून खड्डे बुजविल्याची तसेच शेलगाव देशमुख रोडवरील शेतात विना परवाना महामार्गासाठी अवैध उत्खनन केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

तथापि, मौजे डोणगांव येथील सर्व्हे नं.२६८ या शासकीय जमिनीतून तसेच सर्व्हे नं.३५६/२ या जमिनीतून समृध्दी महामार्गासाठी लागणाऱ्या गौण खनिजाचे (मुरुम) अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित कंपनीस तहसिलदार, मेहकर यांनी अनुक्रमे दिनांक ३/२/२०२० व ४/२/२०२० रोजी रुपये २,५६,६४,७३७/- व रुपये ३६,१३,२६,९००/- इतक्या रक्कमेच्या दंडाचे आदेश बजाविले आहेत. दंडात्मक रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) नगरपरिषेदेच्या हद्दीमध्ये मुख्य रस्त्याच्या बांधकामात ठेकेदारामार्फत अपहार केल्याबाबत

(४२) ३४६१ (२९-०५-२०२०). श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) नगरपरिषेदेच्या हद्दीमध्ये मुख्य रस्त्याकरीता मंजूर झालेल्या ११ कोटी रूपयाचा निधीमध्ये रस्ते खोदकाम, रूंदीकरण, दुतर्फा नाला, विभाजके, वृक्षारोपन इत्यादी अनेक बाबीचा समावेश करण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निविदा काढलेल्या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने जुन्या रस्त्याचे खोदकाम न करता केवळ सोपस्कार म्हणून डांबराचा व बारीक खडीचा भर टाकून फक्त स्वत:च्या घरासमोरील रस्त्याचे रुंदीकरण करून डांबर टाकण्याचे काम केल्या व्यतिरिक्त मान्य निविदेप्रमाणे काहीही काम केले नसल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेकेदाराने मान्य निविदेपैकी केवळ २ ते ३ कोटी रूपयांमध्ये कामे करुन शासनाच्या उर्वरित करोडो रूपयांचा अधिकाऱ्याच्या संगनमताने अपहार केला असल्यामुळे उक्त ठेकेदाराच्या मालमत्तेची सी.आय.डी.मार्फत चौकशी करून त्यास काळया यादीत टाकावे अशी मागणी नागरिकांमधुन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठेकेदाराच्या नोंदणीवर शहरातील बरेच नगरसेवक व शहरातील लहान मोठे ठेकेदार कामे करीत असून सर्वांची देयके या ठेकेदाराच्या खात्यावर जमा होतात म्हणुन कोणीही त्याच्याविरोधात जाण्यास तयार होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (३१-०७-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्हा परिषदेमधील रिक्त पदे भरण्याबाबत

(४३) ३५१२ (२९-०५-२०२०). श्री.विप्लव बाजोरिया : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा परिषदेमध्ये गट "अ" व गट "ब" ची पदे (महाराष्ट्र विकास सेवेतील पदे वगळून) वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिंचन विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग, शालेय शिक्षण विभाग व इतर विभागातील पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी वर्ग-२, उप अभियंता वर्ग-२, उप अभियंता (स्थापत्य) वर्ग-२, तालुका आरोग्य अधिकारी गट अ, वैद्यकिय अधिकारी गट-ब तसेच पशुधन अधिकारी गट-अ, गट शिक्षणाधिकारी वर्ग-२, मुख्याध्यापक गट-२, अधीक्षक (राजपत्रित), समाजकल्याण अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी ही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागातील पदे रिक्त असल्यामुळे कोविड-१९ या महामारीमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागावर कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने परभणी जिल्हा परिषदेमधील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (१३-०८-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत खालीलप्रमाणे पदे रिक्त आहेत.

बांधकाम विभागांतर्गत उप कार्यकारी अभियंता-१, उप अभियंता-०३, ग्रापापू विभागांतर्गत सहा. भुवैज्ञानिक ०१, उप अभियंता (दे.व.दु.कक्ष) ०१, उप

अभियंता ०२, लघु सिंचन विभागांतर्गत जिल्हा जलसंधारण अधिकारी ०१, उप विभागीय जलसंधारण अधिकारी ०४, आरोग्य विभागांतर्गत जिल्हा आरोग्य अधिकारी ०१, सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी ०१, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी ०१, माता व बाल संगोपन अधिकारी ०१, तालुका आरोग्य अधिकारी ०१, वैद्यकीय अधिकारी गट अ ०९, वैद्यकीय अधिकारी गट ब ०१, प्रशासकीय अधिकारी ०१, सांख्यिकी अधिकारी ०१, शिक्षण विभागांतर्गत उप शिक्षणाधिकारी (प्रा) ०१, अधीक्षक गट २ - ०३, गट शिक्षणाधिकारी -०७, लेखाधिकारी शालेय पोषण आहार ०१, मुख्याध्यापक गट २ - २९, बालविकास प्रकल्प अधिकारी - १० वरीलप्रमाणे प्रश्न - २ नुसार पदे रिक्त आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी ग्रामविकास विभागाचे दिनांक ०३/०९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संबंधित विभागांना रिक्त पदे भरण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गेवराई (जि.बीड) येथील धान्याचा काळाबाजार रोखण्याबाबत

(४४) ३५१७ (०२-०६-२०२०). श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथे गोरगरिबांसाठी असणारे धान्य काळाबाजारात घेवून जात असताना पोलीस अधीक्षकांच्या पथकाने दिनांक ०६ मे, २०२० रोजी मध्यरात्री दीड वाजता गोदामावर छापा मारुन कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारवाईमध्ये १२ चाकी ४ गाड्या एकाच वेळी पकडून ४०० क्विंटल तांदूळ व ३०० क्विंटल गहू पांढरवाडी गोदामामधून जप्त करण्यात आला असून या गोदामामध्ये हजारो रिकामी पोती आढळून आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रमाणेच अंबाजोगाई, परळी, बीड, माजलगाव तालुक्यामध्येही धान्य महसूली अधिकाऱ्यांच्या संगनमताने करोडो रुपयांचा गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त सर्व तालुक्यात होत असलेला धान्याचा गैरव्यवहार रोखण्याकरीता कार्यवाही करुन संबंधित दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ (१७-०८-२०२०) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर कारवाईमध्ये १२ चाकी ४ व १० चाकी दोन अशी एकूण ६ वाहने आढळून आल्याने ती जप्त करण्यात आली आहेत. त्यामध्ये गहू २३१ क्विंटल, तांदूळ ९५.५० क्विंटल व साखर ६.०० क्विंटल इतका साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच ५० रिकाम्या गोण्याचा एक गठ्ठा, ज्युटच्या ४१ गठ्ठे, प्लास्टीक गोण्यांचे ५० गठ्ठे असे एकूण १३ गठ्ठे व सुट्टया प्लास्टीकच्या २०० रिकाम्या गोण्या व पांढऱ्या प्लास्टीकचा एक बॉक्स गठ्ठा आढळून आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारीची चौकशी करुन ३० दुकाने निलंबित करण्यात आलेली आहेत. रास्तभाव दुकानावर धान्य वाटपासाठी शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली असून जिल्ह्यातील सर्व शासकीय गोदामे तपासण्यात आलेली आहेत. E-Pos मशीन व Easy App चा वापर धान्य वाटपासाठी केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खाजगी अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना एकत्रित शाळा कर्मचारी सेवाशर्ती लागू होणेबाबत

(४५) ३५५० (२८-०५-२०२०). डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत खाजगी अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती अधिनियम, १९७७ व नियमावली १९८१ लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पटसंख्येचे समर्थन करण्यात न आलेल्या खाजगी अनुदानित आश्रमशाळेतील अतिरिक्त शिक्षकास अन्यत्र सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही या नियमांतर्गत पूर्ण करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कायदा व नियमावलीकडे दुर्लक्ष करुन खाजगी अनुदानित आश्रमशाळेतील अतिरिक्त शिक्षकांना सेवा संरक्षण न देण्याचा शासनाने आदेश निर्गमित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नियमावलीकडे दुर्लक्ष करून खाजगी अनुदानित आश्रमशाळेतील अतिरिक्त शिक्षकांना सेवा संरक्षण देण्याबाबत व कायद्यात दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धनंजय मुंडे (२८-०७-२०२०) : (१), (२) व (३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

ठाणे जिल्हा प्रशासनाने काढलेल्या रेती लिलावाच्या निविदाबाबत

(४६) ३५६४ (०३-०६-२०२०). श्री.जयंत पाटील : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा प्रशासनाने गेल्या पाच वर्षात वेळोवेळी रेती लिलावाच्या निविदा काढण्यात आल्या असून शासनाने रेती पट्टे भाड्याने देण्यासाठी निर्धारित केलेली रक्कम जास्त आणि जे पट्टे शासन देणार आहे त्या ठिकाणी रेती कमी असल्याने गत पाच वर्षात एकाही ठेकदारांनी रेती लिलावात भाग घेतला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे गेल्या पाच वर्षात शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील रेतीवर घातलेल्या निर्बंधावर पर्याप्त उपाययोजनेसाठी व महसूलीत वाढ होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२८-०७-२०२०) : (१), (२) व (३) ठाणे जिल्ह्यात सन २०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी यांत्रिक साधनांव्दारे रेती उत्खननासाठी प्रस्तावित केलेल्या ३ रेती गटांचे वेळोवेळी ई-निविदेसह ई-लिलाव आयोजित करण्यात आले आहेत. तथापि, उक्त रेतीगट मोठे असल्याने व वाळूगटासाठी निर्धारित रक्कम जास्त असल्याचे कारण देऊन रेती व्यावसायिकांकडून ई-लिलाव प्रक्रियेस प्रतिसाद मिळालेला नाही.

सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षात ठाणे व पालघर जिल्ह्यातील वसई खाडीतील संयुक्त रेतीगटाचे लिलाव झाले असून सदर संयुक्त वाळूगटापासून सन २०१८-२०१९ मध्ये रुपये ४,३७,३९,४७४/- व सन २०१९-२० मध्ये रुपये ४,८४,८९,०९२/- इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे. तसेच ठाणे जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर आळा घालण्यासाठी जिल्हा, उपविभाग तसेच तालुकास्तरावर भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकामार्फत गौण खनिजाच्या अवैध उत्खननाच्या व वाहतूकीच्या प्रकरणी सन २०१५-१६ मध्ये रुपये ३२१.७८ लक्ष, २०१६-२०१७ मध्ये रुपये ८५०.०३ लक्ष, २०१७-२०१८ मध्ये रुपये ६६५.९२ लक्ष, २०१८-२०१९ मध्ये ५४१.७७ लक्ष व सन २०१९-२०२० मध्ये ४१९.८९ लक्ष इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे.

दिनांक ३/९/२०१९ रोजीच्या सुधारित वाळू/रेती निर्गती धोरणानुसार राज्यात वाळू लिलाव प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यात नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशनच्या वितरण वाहिनीचे मनोरे उभारण्याचे काम सुरु असल्याबाबत

(४७) ३५८४ (२८-०५-२०२०). श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील विविध मार्गावरून नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशनच्या वितरण वाहिनीचे मनोरे उभारण्यात येत असून त्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित होण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांच्यामार्फत संबंधित शेतकऱ्यांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत तसेच मनोरा उभारणीसाठी शेतकऱ्यांसोबत होत असलेला करार हा प्रतीमाह होत नसून तो कायमस्वरूपी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकारामध्ये शेतकऱ्यांच्या बागायत जमिनी कायमस्वरूपी जाणार असल्याने शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात असून अनेक सामाजिक संस्था व शेतकरी यांनी योग्य मोबदला मिळाल्याशिवाय एक इंचही जमीन देणार नाही असा इशारा प्रशासनाला लेखी निवेदनाव्दारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. नितिन राऊत (२७-०७-२०२०) : (१), (२), (३) व (४) नॅशनल थर्मल पॉवर कार्पोरेशन कंपनीने फतेहवाडी, ता.सोलापूर येथे उजनी धरणाचे पाणी उचलण्यासाठी १३२ के.व्ही. चा प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित केले असून सदर प्रकल्पापासून सोलापूर, मंगळवेढे, पंढरपूर, माळशिरस, इंदापूर व माढा या तालुक्यामधून पारेषण वाहिन्या जात आहेत. सदर कामासाठी ३८२ टॉवर्स प्रस्तावित आहेत. सदर टॉवरपैकी ३२१ मनोरे/वाहिनी कामाकरीता भारतीय विद्युत कायदा २००३ व शासन निर्णय क्रमांक धोरण २०१६/प्र.क्र.५२०/ऊर्जा-४

दिनांक ३१/०५/०१७ नुसार टॉवरखालील जमीन धारकांना शासनाच्या दरपत्रकाप्रमाणे मोबदला देण्यात आला. त्यानुसार नॅशनल थर्मल पॉवर कार्पोरेशने मनोरे/वाहिनी कामाबाबतचे करारपत्र न करता शेतकऱ्यांकडून संमतीपत्र घेतलेली आहेत.

उर्वरीत जवळपास ३२ शेतकऱ्यांनी योग्य नुकसान भरपाई मिळणेबाबत तसेच जवळपास १६ शेतकऱ्यांनी तांत्रिक मुद्दे उपस्थित करुन नॅशनल थर्मल पॉवर कार्पोरेशनकडे व उपविभागीय अधिकारी, पंढरपूर कार्यालयाकडे निवेदने दिलेली आहेत. सदर टॉवर कामाची जमीन/पीकपाणी नुकसान भरपाई निश्चित करणेबाबत शासन निर्णय क्र.धोरण-२०१६/प्र.क्र.५२०/ऊर्जा-४ दिनांक ३१/०५/२०१७ तील तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांनी संबंधित शेतकऱ्यांची नुकसान भरपाई नियमाप्रमाणे निश्चित करून संबंधितास अवगत केले असून आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात पुराच्या कारणाचा शोध घेऊन उपाययोजना सुचविण्याबाबत

(४८) ३७८७ (१९-०६-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गोपिचंद पडळकर : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात माहे जुलै-ऑगस्ट, २०१९ च्या पावसाळ्यात आलेल्या पुरामुळे प्रचंड नुकसान झाल्यानंतर या पुराच्या कारणाचा शोध घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान जलसंपदा विभागाचे निवृत्त प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ञांच्या समितीने आपला अहवाल मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २७ मे, २०२० रोजी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुषंगाने कोणकोणते निर्णय घेतले आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (२९-०७-२०२०) : (१) होय.

समितीने कृष्णा उपखोऱ्याचा अहवाल सादर केला आहे. तथापि, भीमा उपखोऱ्याच्या अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(२) वडनेरे समितीचा कृष्णा उपखोऱ्याचा अहवाल व शिफारशी जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या अहवाला संदर्भात विविध विभागाचे अभिप्राय घेऊन शिफारशी स्वीकृतीबाबत निर्णय घेण्याची प्रक्रिया शासनस्तरावर चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खाजगी संगणक व इंटरनेट जोडणी असलेले व्यावसायिक अधिकृत वेबसाईट व इतर वेबसाईटवरुन सातबारा उतारे काढत असल्याबाबत

(४९) ४२२५७ (०२-०८-२०१८). श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकरी, व्यावसायिक, विद्यार्थी यांना सातबारा काढण्यासाठी शासनाने सेतू सुविधा केंद्रावर ऑनलाईन सातबारा काढण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे नागरीकांचा वेळ वाचत असून सेतू सुविधा केंद्रावरील ऑनलाईन सातबारा उतारा काढल्यामुळे शासनास महसूल प्राप्त होतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी संगणक व इंटरनेट जोडणी असलेले व्यावसायिक अधिकृत वेबसाईट व इतर वेबसाईटहूनही सातबारा काढत असल्यामुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेतू सुविधा केंद्रावरील सातबारा आढावा याबाबत शासनाने मार्गदर्शन सूचना तयार केल्या आहेत काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२४-०८-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील जनतेला https://bhulekh.mahabhumi.gov.in या संकेतस्थळावरून देण्यात येणारा विनास्वाक्षरीत गा.न.नं. ७/१२ हा नागरीकांच्या माहितीसाठी असून कोणत्याही शासकीय अथवा कायदेशीर कामासाठी वापरता येणार नाही अशी सूचना गा.न.नं. ७/१२ वर नमूद करण्यात आली आहे.

तसेच http://aapleabhilekh.mahabhumi.gov.in/dslr या संकेतस्थळावरुन जेवढे गा.न.नं. ७/१२ Digital signature झालेले आहेत तेवढेच गा.न.नं. ७/१२ दिनांक १ मे, २०१८ पासून शेतकरी/ नागरीकांना मोफत उपलब्ध करून देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३१/०५/२०१८ रोजी केली होती. त्याप्रमाणे जनतेमध्ये जागृती होण्यासाठी मोफत गा.न.नं.७/१२ उपलब्ध करून दिले होते. आता दिनांक २०/०९/२०१९ पासून सदरचा गा.न.नं. ७/१२ डाऊनलोड करण्यासाठी प्रति गा.न.नं. ७/१२ रक्कम रूपये १५/- आकारण्यात येत आहेत.

तसेच भूलेख संकेतस्थळावरून आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत देण्यात येणाऱ्या संगणीकृत गा.न.नं. ७/१२ व ८ अ खाते उताऱ्याबाबत मार्गदर्शक सूचना माहिती व तंत्रज्ञान विभागाने दिनांक १९/१२/२०१९ रोजी सूचना निर्गमित केल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ख्रिस्तीय चर्च समिती, बोर्ड, संघटना व संस्था यांनी चर्चच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

(५०) ४६५०१ (२०-०१-२०१४). डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ख्रिस्तीय चर्च समिती, बोर्ड, संघटना व संस्था यांच्याकडून चर्चच्या जमिनीवर अतिक्रमण करुन त्या जमिनींची बेकायदेशीर विल्हेवाट व लूट होत असल्याचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१३ च्या शासनाच्या सर्वेक्षणामध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व आतापर्यंत किती ख्रिस्तीय चर्च समिती, बोर्ड, संघटना व संस्थांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उध्दव ठाकरे (१८-०८-२०२०) : (१) महाराष्ट्र राज्यातील ख्रिस्तीय चर्च समिती, बोर्ड, संघटना व संस्था यांच्या जमिनीचे सर्वेक्षण ही बाब विधी व न्याय विभागाच्या अधिकार क्षेत्रातील नाही, सबब, ऑगस्ट-सप्टेंबर, २०१३ मध्ये अशा प्रकारचे शासकीय सर्वेक्षण या विभागाकडून करण्यात आलेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

श्री.राजेंद्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आले आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.